# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 20/12/2019 (शुक्रवार)
# (सकाळ)

---

## घरफोडी

1) पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 6 कि. मी. अंतरावर मौजा खुरजगाव येथे दिनांक 18/12/2019 चे 17.00 वा. ते दिनांक 19/12/2019 चे 15.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– विजय केशव कारेमोरे, वय 46 वर्ष, रा. खुरजगाव हे घराचे दाराला कुलूप लावुन परिवारासह रोहना तह. काटोल येथे कार्यक्रमाला गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींच्या घरातील दिवान मध्ये ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने असा एकुण कि. 1,26,000/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. सुरेश मट्टामी हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 13 कि. मी. अंतरावर मौजा पटगोवरी येथे दिनांक 19/12/2019 चे 01.00 वा. ते 03.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रविंद्र रमेशजी मंदीरकर, वय 31 वर्ष, रा. पटगोवरी रामटेक हे घरी हजर होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचा मागील दराचा कडी उघडुन घरात प्रवेश करून खुटीला लटकविलेल्या कोटाच्या खिशात ठेवलेले नगदी 15,000/–रू. व गावातील श्रावन नेवारे याचे घराचे मागील दाराचा कडी तोडुन घरात प्रवेश करून कपाटातील सोन्या– चांदीचे दागीने किंमती 6,000/–रू. तसेच दशरत कुळे यांचे घरातील कपाटात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागीने किमत 25,300/–रू. असा एकुण कि. 46,300/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रामेश्वर रावते हे करीत आहे.

# चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 54 कि. मी. अंतरावर चिमुर ते चंद्रपुर येथे दिनांक 18/12/2019 चे 15.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. मालती रमेश डेकाटे, वय 40 वर्ष, रा. तोडापेठ नविन वस्ती नागपुर या साक्षगंधाचा कार्यक्रम असल्याने बसने जात होत्या. दरम्यान फिर्यादी चिमुर बसस्टॅन्ड येथे उतरते वेळी त्यांच्या हैन्ड बैग मधुन अज्ञात आरोपीने 1 तोळयाचा मंगळसुत्र कि. 32,500/– रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर